# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ८९-२३** **दिनांक :- २०/०३/२०२३**

## स्टेट्स ॲण्ड स्पा फॅमिली सलुनच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविणा-या सेंटरवर कारवाई करुन ०३ पीडित महिलांची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक १८/०३/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिति मिळाली की, स्टेट्स ॲण्ड स्पा फॅमिली सलुन, गाळा नं. १०६/३, सी मॅझिक ऑर्केस्ट्रा बारच्या जवळ, पेणकरपाडा, काशिमीरा येथे फॅमिली सलुन या स्पाचे चालक शितल कोळी व मॅनेजर प्रदिप राजोरीया हे मसाजच्या नावाखाली मोबदला स्विकारुन वेश्यागमनासाठी मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक कक्षाचे पो.नि. श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व पंच यांना स्टेटस ॲण्ड स्पा फॅमिली सलुन, गाळा नं.१०६/३, सी मॅझीक ऑर्केस्ट्रा बारच्या जवळ, पेणकरपाडा, काशिमीरा या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १६.२५ वा. छापा कारवाई केली असता स्टेटस ॲण्ड स्पा फॅमिली सलुनचे जागा मालक पाहिजे आरोपी १) दिनेश अमीन, रा. कांदिवली, २) स्पा चालक श्रीमती शितल कोळी, रा. गोरेगाव यांच्या समंतीने मॅनेजर प्रदिप राजोरीया याने बोगस गिऱ्हाईकास नमुद स्पामध्ये बोलावुन सफाई कामगार छोटुकुमार उर्फ लोकेश यादव याचे मार्फतीने ०३ महिलांना दाखवुन त्यांना वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरविली व स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम मॅनेजर प्रदिप राजोरीया याने स्विकारुन बोगस गिऱ्हाईकाला महिला पुरविल्याने वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०३ पीडित महिलांची सुटका करण्यात आली.

सदरबाबत स.फौ. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन पाहिजे आरोपी जागा मालक १) दिनेश अमीन, रा. कांदिवली, २) स्पा चालक श्रीमती शितल कोळी, रा. गोरेगाव व ताब्यात घेतलेले मॅनेजर प्रदिप राजोरीया, सफाईकामगार छोटुकुमार उर्फ लोकेश यादव यांच्या विरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I २०९/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.पा. अंम. अश्विनी भिलारे, म.सु.ब. सोनाली मोरे सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

**------000-------**